प्रेस नोट दि.२७/०९/२०१७

## सराईत अट्टल वाहनचोर व घरफोडी करण्याऱ्या चोरास चंदननगर पोलीसांनी पाठलाग करून शिताफीने केले अटक

चंदननगर पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र मुळीक यांनी तपास पथकाचे अधिकारी व कर्मचारी यांना पोलीस स्टेशन हद्दीतून झालेल्या वाहन चोऱ्या व घरफोडया या उघडकीस आणणेकामी केले मार्गदर्शनाअन्वये तपास पथकाचे अधिकारी व कर्मचारी हे चंदननगर पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंग करून वरील अनुशंगाने माहिती काढत असताना पोलीस कर्मचारी तुषार खराडे यांना सराईत वाहनचोरी व घरफोडी करणारा इसम हा खराडी बायपास रोड येथे थांबलेला असलेबाबत त्याच्या वर्णनासह मिळालेल्या खबरीवरून सदरची माहिती वरिष्ठांना कळवून त्यांच्या सूचनाप्रमाणे तपास पथकाच्या स्टाफने खराडी बायपास चौक भागात सापळा लावून शोध घेतला असता खबरीतील वर्णनाचा इसम दिसून आला तेव्हा त्यास स्टाफच्या मदतीने शिताफीने पकडून त्यास चंदननगर पोलीस स्टेशन येथे आणून त्यास विश्वासात घेवून तपास करता त्याने एक घर फोडी चोरी केली असल्याचे कबूल केल्याने त्याने चोरी केलेले ठिकाण सांगितले त्यावरून त्यास प्रथम चंदननगर पो.स्टे गु.र.नं.३२७/१७ भादवि कलम ४५७,३८० मध्ये अटक करून त्याचे कडे पोलीस कस्टडीत तपासात त्याने विविध ठिकाणावरून वाहन चोऱ्या केल्या असल्याचे कबूल करून त्यामध्ये चोरी केलेली ०४ वाहने तसेच ०४ मोबाईल असा एकूण किं.रू.१,५४,७५०/- चा माल हस्तगत करण्या आला आहे. सदर जप्त मालाबाबत चंदननगर पोलीस स्टेशनकडील एक घर फोडीचा व दोन वाहनचोरीचे तसेच समर्थ पोलीस स्टेशनकडील एक व यवत पो.स्टे कडील एक वाहन चोरीचा गुन्हा असे एकूण पाच गुन्हे उघडकीस आले आहेत. पुढील तपास अजित धुमाळ करीत आहेत. तसेच आरोपी नामे चार्ल्स जेम्स थापा, रा. मुंढवा यांचेकडून होंडा ॲक्टीव्हा किं.रू.३००००/- ची ही हस्तगत करून चंदननगर पोलीस स्टेशन कडील एक वाहनचोरीचा गुन्हा उघडकीस आला आहे. सदर गुन्हयाचा तपास तुषार भिवरकर हे करीत आहेत.

उपरोक्त कारवाई पोलीस उप आयुक्त सो.परी मंडळ ४ श्री दिपक सोकोरे, सहा पोलीस आयुक्त सो. खडकी विभाग श्री वसंत तांबे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक चंदननगर पोलीस स्टेशन श्री.राजेंद्र मुळीक, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक नंदकुमार घाग, पोलीस हवा. अजित धुमाळ, मोहन वाळके,आणा माने, तुषार भिवरकर, तुषार खराडे, अविनाश गोरे, आनंद दरेकर, दत्ता शिंदे, विक्रांत सासवडकर यांनी केली आहे .